# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १५.०९.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— अवैधरित्या दारु विक्री करणाऱ्या तसेच प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या ईसमाविरूध्द गुन्हे दाखल.**

**अ**) दिनांक १५.०९.२०२६ रोजी एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे वाडी हद्यीत रात्रगस्त करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, खडगाव रोड, सोनबानगर येथे राहणारा महादेव उर्फ मोगली नावाचा इसम आपले राहते घरुन दारुविक्री करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे एक इसम मिळून आला. त्यास नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव महादेव उर्फ मोगली लिंगाजी कन्नुर, वय ५० वर्षे, रा. सोनबानगर, खडगाव रोड, वाडी, नागपुर असे सांगितले. त्याचे राहते घराची झडती घेतली असता, घरात गणरायाची स्थापना केलेल्या ठिकाणी एक खड्डा करून, त्यामध्ये देशी दारु भिंगरी चा साठा केलेला मिळून आला. आरोपीस मुद्येमालाबाबत विचारणा केली असता, त्याने तो विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन दारु व दारुविक्रीचे रोख असा एकूण ७,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपीस ताब्यात घेवुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो सराईत दारुविक्री करणारा असल्याने, मा. पोलीस उपआयुक्त, परि. क्र. १ यांनी गणेशोत्सव काळापुरते तात्पुरते हद्यपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी याने मा. पोलीस उपआयुक्त, परि.क्र. १ यांचे मनाई आदेशाचे उल्लघन केल्याने व समक्ष अवैधरित्या दारुविक्री करतांना मिळून आल्याने त्याचेविरुध्द पोलीस ठाणे वाडी येथे कलम २२३ भान्यासं. सहकलम ६५(ई) म.दा.का. अन्वये गुन्हा दाखल करुन, आरोपीस मुद्येमालासह वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

**ब)** तसेच, वेळ ०३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्यीत, मोठा ताजबाग परिसरात रात्रगस्त करीत असतांना, ''केजीएन पान शॉप'' सुरु असल्याचे दिसुन आले. पानशॉप मालक यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शेख शफी मोहम्मद मालाधारी, वय ५८ वर्ष असे सांगितले. त्याचे पानशॉपमध्ये शासन प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, पंचासमक्ष पानशॉपची झडती घेतली असता, तेथे तंबाखुजन्य हुक्का फ्लेवर्स, खर्रा व पानमसाला गुटखा असा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन तंबाखुजन्य पदार्थ विक्रीचे रोख व शासन प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ असा एकुण ८,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने निर्धारित केलेल्या वेळेपेक्षा रात्री उशीरापर्यंत आस्थापना उघडी ठेवुन, तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीररित्या विक्री करतांना समक्ष मिळून आला. पानशॉप चालकाविरूध्द पोलीस ठाणे सक्करदरा येथे गुन्हा दाखल करुन, मुद्येमालासह आरोपीस सक्करदरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात, सपोनि. भगवान कोळी, पोहवा. विजय गिरी, पोअं. आशिष गायधने, अर्शद शेख, मनोज निमकर, दिनेश क्षीरसागर व चापोअं. चंद्रकांत यांनी केली.

**<u>२) पोलीस ठाणे लकडगंज :— शस्त्रासह धुमाकुळ घालणाऱ्या हद्दपार आरोपीस अटक.</u>**

दिनांक १४.०९.२०२६ चे २१.१५ वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, राधास्वामी सत्संगचे गल्लीमध्ये निलेश नावाचा हद्दपार इसम धुमाकुळ घालत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन घटनास्थळी गेले असता, तेथे एक इसम आपले हातात चाकु घेऊन येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना आरडा—ओरड करून, शिवीगाळ करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेऊन, त्याचे हातातील चाकु काढून नि:शस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव निलेश उर्फ निलु विलासदास सोनवानी, वय २३ वर्षे, रा. मासुरकर चौक, राजु राठीचे घरी किरायाने, लकडगंज, नागपूर असे सांगीतले. त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती २००/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे आदेश क्र. ०४/२०२४ दिनांक २७.०८.२०२४ अन्वये नागपूर शहर व ग्रामिण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. त्यावेळी आरोपी हा फरार असल्याने हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नव्हती. पोलीसांना तो मिळून आल्याने दिनांक ०४.०३.२०२६ रोजी हद्दपार आदेश तामिल करण्यात आला होता.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने फिर्यादी पोहवा. सतिष निमजे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री शिवप्रसाद पारवे, सहायक पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) व वपोनि. श्री मुकुंद कवाडे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. दीपक कोफडे, सागर शिंदे, पोहवा सतिश निमजे, पोअं. देवेंद्र सेलुकर यांनी केली.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे शांतीनगर</u> :—** दिनांक ०७.०९.२०२६ चे २३.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे शांतीगनर हद्दीत, एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ७० वर्षे वयाचे, आजारी व बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल वार्ड नं. ३९ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १७.०९.२०२६ चे २२. ३० वा. सुमारास, वार्ड चे सिएमओ डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे कळमना येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे पोउपनि. प्रशांतराज जाधव यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे सिताबर्डी</u> :—** कु. सीनम फातेमा वय २० वर्षे, रा. ४८, जुना मानकापुर, रिंग रोड, मकबुल मस्जिद जवळ, मानकापुर, नागपूर ही दिनांक ०३.०९.२०२६ चे १२.०० वा. पासुन पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील इंस्टीटयुट ऑफ सायन्स कॉलेज गेटजवळून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५

फुट ५ इंच, डोळे–काळे, केस–काळे लांब, अंगात–आकाशी रंगाची कुर्ती व निळ्या रंगाचा पायजामा घातलेला आहे. भाषा–हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :–** कु. सिया पवन गौर वय १३ वर्षे, रा. ईसासनी, शांतीनगर, शंकर मंदीर जवळ, एमआयडीसी, नागपूर ही दिनांक ०५.०१.२०२६ चे ०९.३० वा. पासुन पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतील राहते घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट, डोळे–काळे, केस–कुरळे, अंगात–काळ्या रंगाचा जिन्स व कत्था रंगाचा टॉप घातलेला आहे. भाषा–मराठी/हिंदी बोलते.



कु. सीनम



कु. सिया

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हा न्यायाधिश –२२ तथा अति. जिल्हा न्यायाधीश, नागपुर. | १४/२०१८ | कलम २७, २९ एन.डी. पी.एस. ॲक्ट | श्याम सुखदेव भंडारगे, रा. झाडे यांचे घरी, शिवाजी नगर, चिटणीस वाड्याजवळ, नागपुर. | १६.०९.२०२६ |

**स्वा/–**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## जाहीर नोटीस

सर्व फटाके विक्रेते, दुकानदार व ठोक विक्रेते यांना सुचित करण्यात येते की, जे फटाके विक्रेते चालू वर्षी (२०२६) दिवाळी निमित्त फटाका विक्री करीता अस्थाई फटाका परवाना प्राप्त करू इच्छितात, अशा इच्छुकांकरिता अस्थाई फटाका परवान्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज त्यांचे सबंधीत पोलीस उपआयुक्त, परिमंडळ १, २, ३, ४, ५ व ६ यांचे कार्यालयातून दिनांक १६/०९/२०२६ पासुन दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत उपलब्ध होतील. या विहीत नमुन्यातील अर्जातील सविस्तर माहितीसह व कागदपत्रांसह (जागेचे ना हरकत प्रमाणपत्र, आजुबाजुच्या रहिवाश्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र, जागेच्या मालकी हक्का बाबतची कागदपत्रे स्थळदर्शक नकाशा, अग्निशमन व्यवस्था केल्याबाबत अग्निशमन अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे ना-हरकत प्रमाणपत्र ई .) दिनांक १६/०९/२०२६ ते १५/१०/२०२६ पर्यंत सबंधीत पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र.१, २, ३, ४, ५ व ६ यांचे कार्यालयात सादर करावे. दिनांक १५/१०/२०२६ नंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सर्व फटाके विक्रेते, दुकानदार व ठोक विक्रेते यांना असेही सुचीत करण्यात येते की, मा. हरित लवद यांचे ओए-२४९/२०२०, दिनांक ०९/११/२०२० व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक एमपीसीबी/जेडी (एपीसी)/टीबी-बी/२०१११०-एफटीएस-०११ दिनांक ०९/११/२०२० चे आदेशानुसार नागपूर शहर हे मध्यम (Moderate) प्रकारच्या वर्गीकृत हवेचे प्रदूषणाचे शहर असल्याने फक्त ग्रिन फटाके (Green Crackers) विक्रीसाठी ठेवण्यात यावेत. तसेच अग्निरोधक उपकरणे लावावीत. केंद्र / राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्गमीत होणारे आदेश सर्व फटाके विक्रेत्यांवर बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी.

तसेच सिताबर्डी मेनरोड / महाल चौक ते गांधीगेट चौक / महाल चौक ते भोसला वाडा/ महाल चौक ते बडकस चौक / कल्याणेश्वर मंदीर परिसर / गोळीबार चौक ते टिमकी तिन्नल चौक ते शहीत चौक / शहीद चौक ते टांगा स्टॅण्ड / हंसापूरी ते नालसाब चौक / मस्कासाथ चौक ते नेहरू पुतळा / मारवाडी चौक / मेयो हॉस्पीटल परिसर/डागा रूग्णालय / मेडीकल कॉलेज परिसर / इंदोरा चौक ते कमाल टॉकीज चौक / गोकुळ पेठ मार्केट /सदर रेसिडेन्सी रोड तसेच गर्दीच्या व गजबजलेल्या रोडवर अस्थाई फटाके परवाने मंजुर केले जाणार नाहीत, या भागात अस्थाई फटाका परवाना करिता कोणीही अर्ज करू नयेत.

<u>सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन फटाका विक्रेत्यांसाठी महत्वाच्या सुचना</u> :-

१) फटाक्यांना सुरक्षीत आणि अज्वलनशिल साहित्यापासुन बनविलेल्या शेड मध्ये ठेवावे.

२) प्रत्येक तात्पुरत्या फटाका दुकानांमधील एक - दुसऱ्या पासूनचे सुरक्षा अंतर ३ मीटर असावे आणि संरक्षीत स्थळापासून ५० मीटर अंतरावर असावे.

३) फटाका दुकानाचे साठा आणी विक्रीसाठी अस्थायी शेड चा पुढील भाग एक - दुस-याच्या समोरासमोर राहणार नाही.

४) सुरक्षा अंतराचे आत फटाका दुकानांमध्ये प्रकाश व्यवस्थेसाठी कोणत्याही प्रकाराचे तेल लॅम्प, गॅस लॅम्प आणि खुल्या विद्युत दिव्यांचा प्रयोग होणार नाही याची काळजी घ्यावी. जर काही विजेच्या लाईनचा प्रयोग केला जात असेल तर त्याला भिंतीला किंवा छतावर मजबुतीने लावावे लागेल, कोणत्याही प्रकारची विद्युत तार लटकलेल्या अवस्थेत राहणार नाही. कोणतेही विद्युत तार कुठूनही तुटलेला किंवा खुल्या रूपाने जोडलेला असू नये. विद्युत दिव्यांसाठी स्वीच भिंतीवर लावावे लागेल आणि एका रांगेतील सर्व दुकानांसाठी मास्टर स्वीच लावावे लागेल.

५) कोणत्याही दुकानापासून ५० मीटर चे आत आतिषबाजी प्रदर्शन प्रतिबंधीत आहे.

पोलीस नियंत्रण कक्ष
नागपूर शहर
आवक क्र. 817/26
दिनांक 15/9/26

६) कोणत्याही एका क्लस्टर मध्ये ५० पेक्षा अधिक दुकाने लावण्याची अनुमती राहणार नाही.

७) फटाका दुकाने लाकडी रॅक मध्ये लावू नये तसेच कापडी शामीयानाचा (टेंट) उपयोग करू नये.

८) क्लोरेट उदा. कलर /स्टॉर मॅचेस आणि रोल / डॉट कॅप्स असलेल्या फटक्याच्या वस्तु दुकाणात ठेवण्यात येवू नये आणि विक्री करू नये.

९) केवळ अधिकृत उत्पादकांकडील जिथे विस्तृत तपशिल दिले असेल असे फटाके विक्रीसाठी ठेवावे.

१०) प्रौढ व्यक्ती असल्याखेरीज १८ वर्षाखालील मुलांना फटाके विक्री करू नये.

११) दुकानातुन बाहेर पडण्याचा आपत्कालीन मार्ग पुर्णपणे मोकळा आहे आणि त्या मार्गाला कोणतेही अडथळे नाहीत याची खात्री करावी.

१२) फटाका दुकानात ग्राहकांची गर्दी होवू देवू नये.

१३) दुकानात फटाक्यांचे कोणतेही सुटे भाग प्रदर्शनास ठेवू नये.

१४) फटाके दुकानात धुम्रपान करू नये किंवा कोणत्याही प्रकाराचे खुले दिवे, कंदील, मेणबत्या ठेवू नये.

१५) विक्रेते आणि कामगारांना फटाक्याच्या घातक स्वरूपाबद्दल तसेच पॅकेट्स आणि बॉक्सच्या सुरक्षीत हाताळणी बाबत प्रशिक्षण दिले पाहिजे.

१६) अग्नीशामक यंत्रे आणि बादल्या पुरेशा प्रमाणात ठेवाव्यात तसेच अग्निशमक यंत्रे हाताळणीबाबत सर्व सबंधीतांनी स्थानिक अग्निशामक दलाला सहकार्य करण्याकरिता प्रशिक्षीत असावे.

१७) दुकानासमोर कोणतेही तात्पुरते शेड किंवा प्लॅटफार्म बनवू नये.

१८) सुरक्षेच्या दृष्टीने दुकानांसमोर फटाक्यांचे भरलेले किंवा रिकामे खोके ठेवून नये.

१९) विक्रीसाठी ठेवलेल्या कोणत्याही फटाक्यामध्ये लिथीयम, मरक्युरी, आर्सेनिक लीड आणि स्ट्रोनटियम क्लारोमेट ही संयुगे असू नयेत.

२०) विना परवाना कोणतेही दुकानदार फटाका विक्री करणार नाहीत.

२१) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशन ७२८/२०१५ अन्वये फटाका विक्रेत्यास (सिरीज कॅकर्स व लॉरीज) विकण्यास प्रतिबंध केलेला आहे. तसेच ई-कॉमर्स वेबसाईट फ्लिपकार्ट, ॲमेझॉन, मेशो, ब्लिनकिट, मिंत्रा, अजिओ, स्नॅपडिल इत्यादी संकेतस्थळावर ऑनलाईन फटाके विक्री करता येणार नाही. तसेच सदर रिट पिटीशन मध्ये दिलेल्या निर्देशाचे कटाक्षाने पालन करावे.

२२) वाहतुकीची कोंडी होवून नये म्हणून पोलीस ठाणे कोतवाली, सिताबर्डी, अंबाझरी आणि तहसील या भागात मुख्य बाजारपेठ असल्याने इतवारी, महाल, सिताबर्डी, गोकुलपेठ, बडकस चौक, शहीद चौक, मस्कासाथ इत्यादी गर्दीचे ठिकाणी फटाका दुकाने लावू नयेत. फटाका विक्रेत्यांनी नागपूर शहराचे नो-पार्कींगचे ठिकाणी, ज्वलनशिल पदार्थ विक्रीचे ठिकाण, पेट्रोलपंप, हॉटेल तसेच मुख्य रस्त्याचे कॉर्नरवर, फुटपाथावर तसेच विकास कामाचे ठिकाणी दुकाने लावू नयेत.

V.N.P. 11.09.26

( विश्वास नांगरे पाटील )
पोलीस आयुक्त
नागपूर शहर